


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १०८, शनिवार २२ मार्च २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# सौर उर्जा कंपन्यांची मनमानी

## आ. काशिनाथ दाते यांनी विधानसभेत वेधले लक्ष



मुंबई : प्रतिनिधी

**माझ्या मतदारसंघात शासनाने ५०० एकर क्षेत्रावर सौर उर्जा प्रकल्प उभा करण्यासाठी जमीन हस्तांतरीत केलेली आहे. ज्या कंपन्यांना या जमीनी देण्यात आलेल्या आहेत त्या कंपन्या मनमानी करत आहेत. स्थानिकांना विश्वासात न घेता कामे सुरू करण्यात येत आहेत. ही मुख्यमंत्र्यांची महत्वाकाक्षी योजना आहे.लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून या योजनेचा मतदारसंघात प्रसार होणे गरजेचे असल्याचे सांगत आमदार काशिनाथ दाते यांनी कंपन्यांच्या मनमानीकडे सभागृहाचे लक्ष वेधले.**

अर्थसंकल्पीय अधिवेशनात विविध विषयांवरील चर्चेत भाग घेताना आ. दाते यांनी मतदारसंघातील प्रश्नांकडे लक्ष वेधले.

दाते म्हणाले, माझ्या मतदारसंघातील सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये अतिशय चांगले उद्योग आलेले आहेत. परंतू स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे या शासनाच्या धोरणाची या वसाहतीमध्ये अंमलबजावणी होत नाही. या वसाहतीमध्ये स्थानिकांना रोजगार मिळावा यासाठी ठोस पाऊले उचलणे गरजेचे आहे.

अहिल्यानगर येथेही औद्योगिक वसाहत असून तिचा विस्तार करण्यासाठी शासनाने ६०० एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. माझा पारनेर मतदारसंघ जो आहे तो अतिशय दुष्काळी मतदारसंघ आहे. पाण्याची शास्वत व्यवस्था नाही. औद्योगिकरणाचा भविष्यात विस्तार होत असताना अशा ठिकाणी उद्योग व्यवसाय उभे राहिले तरूणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. नगर-कल्याण महामार्गावर भाळवणी ते कल्याण दरम्यान औद्योगिक वसाहत उभी राहीली तर तालुक्यातील तरूणांना रोजगार उपलब्ध होउ शकेल असे आ. दाते म्हणाले.

### रस्त्यांचा कोटा वाढवा

**माझ्या मतदारसंघात ५०० २००,३०० लोकसंख्येच्या छोटया-छोटया वाडया आहेत. मुख्यमंत्री, पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून वाडया वस्त्या मुख्य रस्त्याला जोडणे गरजेचे आहे. प्रत्येक मतदारसंघासाठी ५० किलोमीटरचा कोटा असून तो अपुरा आहे. हा कोटा किमान शंभर किलोमीटरचा करण्यात यावा.**

**आमदार काशिनाथ दाते,**
**विधानसभा सदस्य**

### ऑनलाईन रेशनकार्डचे उद्दीष्ट वाढवा

**रेशनकार्ड ऑनलाईन करण्याचे जे उद्दीष्ट आहे ते संपलेले असून ते वाढविण्याची आवष्यकता आहे. कारण अनेक रेशनकार्ड धारक ऑनलाईन रेशनकार्डपासून वंचित असल्याचे दाते यांनी सांगितले.**

### ग्रामीण, जिल्हा मार्गांसाठी तरतुद हवी

**ग्रामीण रस्ते किंवा जिल्हा मार्ग यांची अवस्थाही वाईट झालेली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात त्यावर फारशा तरतुदी झालेल्या नाहीत. जुलै मध्ये होणाऱ्या अधिवेशनामध्ये त्यासाठी तरतुद करण्यात यावी. जेणेकरून दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दुरूस्ती होऊ शकेल असे दाते म्हणाले.**

# येरेकरांच्या अनुपस्थितीवर खा. लंके यांचा आक्षेप

- सतत अनुपस्थितीबाबत गांभीर्याने तपास करण्याची मागणी
- मुख्य सचिव सुजाता सैनिक यांच्याकडे तक्रार







अहिल्यानगर : प्रतिनिधी

**अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांची कार्यालयातील अनुपस्थिती वारंवार निदर्शनास येत असून त्यांच्या या अनुपस्थितीचा गांभीर्याने तपास करून आवष्यक ती कारवाई करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**

मुख्य सचिवांना पाठविण्यात आलेल्या पत्रात खा. लंके यांनी म्हटले आहे की, येरेकर यांची कार्यालयातील अनुपस्थिती वारंवार निदर्शनास येत आहे. त्यांच्या अनुपस्थितीमुळे कार्यप्रणालीवर आणि जिल्हा परिषदेच्या कामकाजावर वितरीत परिणाम झाला आहे. येरेकर यांच्या सततच्या अनुपस्थितीतमुळे अनेक सामन्य नागरीकांची प्रशासकीय कामे प्रलंबित राहिली आहेत. यासंबंधी अनेक नागरिकांनी आपल्याकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. येरेकरांच्या अनुपस्थितीमुळे महत्वाचे निर्णय घेताना विलंब होत असून त्याचा कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर नकारात्मक परिणाम होत असल्याचे खात्र. लंके यांनी पत्रात नमुद केले आहे.

### आवष्यक ती कारवाई करावी

**जिल्हा परिषदेच्या कामकाजात नियमितता आणण्यासाठी त्वरीत उपाययोजना केल्या जाव्यात तसेच या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करून आवष्यक ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी खा. लंके यांनी राज्याच्या मुख्य सचिवांकडे केली आहे.**

### महिन्यात फक्त दोनदा ३४ मिनिटे उपस्थिती !

**अहिल्यानगर येथील जिल्हा परिषदेच्या सीईओ दालनातील फेब्रुवारी महिन्याचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सीईओ येरेकर हे २४ फेब्रुवारी रोजी दोन मिनिटे व २५ फेब्रुवारी रोजी ३२ मिनिटे दालनात उपस्थित असल्याचे दिसत आहे. इतर दिवशी ते पुर्णपणे अनुपस्थित असल्याचे दिसत आहे. दरम्यान येरेकरांच्या दालनातील सीसीटीव्ही फुटेज खा. लंके यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना पाठविले आहे.**

# वारंवार गोहत्या करणाऱ्यांना मोक्का लागणार

## आमदार संग्राम जगताप यांच्या लक्षवेधीवर मुख्यमंत्र्यांची घोषणा



अहिल्यानगर : प्रतिनिधी

**वारंवार गोहत्येचे गुन्हे दाखल होऊनही संबंधित गुन्हेगार गोहत्या करत आहेत. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे विधिमंडळाच्या अधिवेशनात केली. त्यावर गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी उत्तर दिल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारंवार गोहत्येचे गुन्हे दाखल होणाऱ्यांवर आता मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा विधानसभेत केली.**

आ. जगताप यांनी गुरुवारी अधिवेशनात श्रीगोंदा तालुक्यात घडलेल्या घटनेचा आधार घेत लक्षवेधी मांडली. २ नोव्हेंबर २०२४ रोजी श्रीगोंदा येथे फटाके वाजवण्यावरून झालेल्या भांडणात गोतस्करी करणाऱ्या अतिक कुरेशी याने केलेल्या मारहाणीत राम ससाणे यांचा मृत्यू झाला होता. गोहत्या व तस्करी, तसेच गुटख्याची तस्करी करणाऱ्या अतिक कुरेशी गँगच्या दहशतीमुळे कोणीही या विरोधात गुन्हा दाखल करण्यास पुढे आले नाही. पोलिसांनीही याकडे दुर्लक्ष केले. कुरेशीवर गो हत्येचे अनेक गुन्हे दाखल असूनही त्याच्यावर कारवाई झालेली नसल्याकडे व अहिल्यानगरमध्ये गोहत्या व तस्करी करणाऱ्यांची मोठी दहशत असल्याचे सरकारच्या निर्देशनास आणून दिले.

आ. जगताप यांच्या या लक्षवेधीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी एखाद्यावर गोहत्येचे वारंवार गुन्हे दाखल झाले, तर त्याच्यावर आता महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कडक कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा करत आ.जगताप यांची मागणी मान्य केली. गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनीही श्रीगोंदा येथे घडलेल्या घटनेसंदर्भात गुन्हेगारांवर पोलिस कारवाई करत असल्याचे सांगितले.

गोहत्येच्या गुन्ह्यात जामीन घेऊन पुन्हा गोहत्या करतात गो हत्या व तस्करी करणाऱ्यांवर वारंवार गुन्हे दाखल होऊनही ते जेलमधून जामिनावर सुटतात व पुन्हा पुन्हा हाच गुन्हा करतात. त्यामुळे अशा गुन्हेगारांवर कडक कायदेशीर कारवाई आवश्यक आहे. शासनाने लव्ह जिहादसाठी कायदा उर्वरीत पान ३ वर

# ड्रोन कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरण करण्यास प्रतिबंध

## वापर करण्यापूर्वी परवानगी आवश्यक | आदेश जारी



पुणे : प्रतिनिधी

**पुणेग्रामीण जिल्ह्यात कोणतीही खासगी व्यक्ती, कार्यक्रम व्यवस्थापन (इव्हेंट मॅनेजमेंट) व छायाचित्रण करणारे व्यावसायिक यांनी ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करण्यापूर्वी त्याची पूर्वमाहिती ७ दिवस आधी संबंधित पोलीस ठाण्यास कळवून, प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक राहील, असे आदेश अपर जिल्हा दंडाधिकारी ज्योती कदम यांनी जारी केले आहेत.**

जिल्ह्यात महत्त्वाची धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था आहेत. त्यामुळे अशा ठिकाणांची ड्रोन कॅमेऱ्याद्वारे टेहळणी होऊन, त्या माहितीचा अतिरेकी कारवायांमध्ये वापर केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दौंड,बारामती,शिरूर या तालुक्यांच्या परिसरामध्ये रात्रीच्या वेळी ड्रोन उडत असल्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत.

अशा घटनांमुळे नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाळू माफियादेखील टेहळणीसाठी ड्रोनचा वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच चोऱ्यांसाठीही ड्रोनच्या माध्यमातून टेहळणी केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. हे आदेश पुढील दोन महिन्यांसाठी लागू राहतील.

उर्वरीत पान ३ वर

# आता महाराष्ट्राला लॉटरी लागणार!

## सरकार केरळ पॅटर्न राबवण्याच्या तयारीत



मुंबई: प्रतिनिधी

**लाडकी बहीण योजनेमुळे अन्य योजनांना कात्री लावण्याची वेळ महायुती सरकारवर आली आहे. एकीकडे लाडकी बहीण योजनेच्या निकषांची काटेकोर अंमलबजावणी करुन लाभार्थ्यांच्या संख्या कमी करुन सरकारी तिजोरीवरील भार हलका करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तर दुसरीकडे उत्पन्न आणि महसूल वाढीसाठी सरकार विविध मार्ग शोधत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सरकार केरळ पॅटर्न राबवण्याच्या विचारात आहे.**

विधिमंडळ अधिवेशनात अर्थमंत्री अजित पवारांनी भाजप नेते आणि माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्त्वात एका समितीची घोषणा केली आहे. विधिमंडळाचं अधिवेशन २६ मार्चपर्यंत चालेल. त्याआधी मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखालील समिती आकारास येईल. राज्याचा महसूल वाढवण्याच्या दृष्टीकोनातून ही समिती काम करेल.

अर्थसंकल्पावरील चर्चेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी महत्त्वाचे मुद्दे मांडले. राज्याचा महसूल वाढवण्यासाठी सरकार विविध पातळ्यांवर प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या माध्यमातूनही प्रयत्न सुरु आहेत. लोकप्रतिनिधींची एक समिती यासाठी तयार केली जाईल. केरळच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या माध्यमातून मिळणारा महसूल कसा वाढवता येईल याच्या शिफारशी समितीकडून केल्या जातील. सुधीरभाऊ मुनगंटीवार या समितीचे अध्यक्ष असतील. ही समिती महिन्याभरात आपला अहवाल देईल, असं अजित उर्वरीत पान ३ वर

# लाडक्या बहिणींवरील माया आटणार!

## त्या महिलांना आता १५०० नव्हे, तर ५०० रुपये



मुंबई: प्रतिनिधी

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ राज्यातील जवळपास अडीच कोटी महिलांना झाला. या योजनेमुळे महायुतीला विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळाले. पण आता सरकारने योजनेच्या लाभार्थ्यांचे निकष काटेकोरपणे तपासायला घेतले आहेत. या निकषात न बसणाऱ्या महिलांना पुढे लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार नाही. योजनेच्या निकषांनुसार तपासणी करताना काही महत्त्वाच्या गोष्टी समोर आल्या आहेत.**

अन्य सरकारी योजनांचे लाभ घेत असलेल्या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार नसल्याचे सरकारने योजना जाहीर करताना सांगितले होते. पण विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर योजना आणताना सरकारनं निकष फारसे काटेकोरपणे पाहिले नाहीत. डबल लाभ घेणाऱ्या महिलांची संख्या सरकारने तपासून पाहिली. अशा महिलांची संख्या सव्वा आठ लाखांच्या घरात जाते.

नमो शेतकरी आणि लाडकी बहीण या दोन्ही सरकारी योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांची संख्या सव्वा आठ लाख असल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान विभागाने केलेल्या तपासातून समोर आले आहे. त्यामुळे या महिलांना लाडकी बहीण योजोनत वार्षिक १८ हजार रुपयांऐवजी केवळ ६ हजार रुपयेच मिळण्याची शक्यता आहे. म्हणजे दर महिन्याला १५०० रुपयांऐवजी केवळ ५०० रुपयेच महिलांच्या हाती पडू शकतात.

नमो शेतकरी योजनेच्या अंतर्गत राज्य सरकारचे ६ हजार रुपये आणि केंद्र सरकारचे ६ हजार रुपये असे १२ हजार रुपये लाभार्थी महिलांना मिळतात. लाडकी बहीण योजनेच्या नियमानुसार, लाभार्थी महिलांना शासकीय योजनेमधून वर्षाकाठी १८ हजार रुपयांपेक्षा अधिक पैसा दिला जाणार नाही.

आता सव्वा आठ लाख महिलांना नमो शेतकरी योजनेतून वर्षभरात १२ हजार रुपये मिळतात. त्याच महिलांना लाडकी बहीण योजनेतून वर्षाला १८ हजार रुपयेही मिळतात. म्हणजेच वर्षाकाठी त्यांना मिळणारा लाभ ३० हजार रुपयांवर जातो. या महिलांचा लाभ कमी करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

त्या महिलांना वर्षाला ६ हजार देण्याचा प्रस्ताव

नमो शेतकरी योजनेतील १२ हजार रुपये लाभार्थी महिलांना मिळत राहावेत आणि लाडकी बहीण योजनेतून वर्षाकाठी ६ हजार रुपये द्यावेत म्हणजे त्यांना शासकीय नियमानुसार वर्षाला १८ हजार रुपये मिळतील असा नवा प्रस्ताव समोर आलेला आहे. माहिती आणि तंत्रज्ञान विभागाने नमो शेतकरी आणि लाडकी बहीण अशा दोन्ही योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांची नावं महिला उर्वरीत पान ३ वर



फॅशन|संसार|सौंदर्य
सखी

# तुमच्या लाडक्या जिन्सबद्दल तुम्हाला हे माहितेय काय ?

**जीन्स कदाचित एकमेव गोष्ट आहे जी कधीही फॅशनच्या बाहेर गेली नाही. तथापि, कालांतराने, जीन्सच्या रचनेत बरेच बदल दिसून आले आहेत. इतकंच नाही तर त्याची स्टाइल आणि डिझाइन्सही खूप वाढल्या आहेत. आज प्रत्येक बॉडी टाईप आणि प्रत्येकाच्या गरजा लक्षात घेऊन जीन्स बाजारात उपलब्ध आहेत. सगळ्यांची आवडती आणि अगदी कॉमन जीन्स पाहून त्यामागचा इतिहास किती मोठा आणि रंजक आहे याचा अंदाज लावता येणार नाही. केवळ इतिहासच नाही तर जीन्सचा पोत, त्याचे नाव, रंग आणि त्याच्याशी संबंधित सर्व गोष्टींमागे एक रंजक कथा आहे...**

१९व्या शतकात फ्रान्समधील निम्स या छोट्याशा गावात प्रथम जीन्स बनवण्यात आली होती. आज जीन्स अनेक रंग आणि पॅटर्नमध्ये आढळू शकते, परंतु आजही जीन्सचा सर्वात सामान्य आणि सर्वात आवडणारा रंग निळा आहे. याचे एक मोठे कारण आहे की जगातील पहिली जीन्सदेखील निळ्या रंगात बनवली गेली होती आणि आजपर्यंत बहुतेक जीन्स याच रंगात बनवल्या जातात. जीन्सला निळा रंग देण्यामागील मुख्य कारण म्हणजे त्या काळात जीन्स मजूर आणि शेतात काम करणारे कामगार परिधान करत असत, ज्यांचे कपडे लवकर घाण होतात. त्यामुळे जीन्सला असा गडद निळा रंग देण्यात आला होता.

## जीन्सच्या लहान खिशाचे कार्य

जीन्सचा एक भाग असा असतो जो सर्वांचे लक्ष वेधून घेतो, पण त्यामागचे कारण कोणीही विचारले नाही किंवा जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही, हा भाग म्हणजे जीन्समध्ये बनवलेला एक छोटासा कप्पा आहे. आपल्यापैकी बहुतेकांना असे वाटते की हा एकतर जीन्सच्या डिझाइनचा एक भाग आहे किंवा नाणी किंवा शिक्के यासारख्या छोट्या गोष्टी ठेवण्यासाठी उपयुक्त ठरेल. तुम्ही ते वापरू शकता आणि तुमच्या गरजेनुसार आणि सोयीनुसार काहीही ठेवू शकता, पण ते बनवण्यामागचे खरे कारण काहीतरी वेगळे आहे. हे छोटे खिसे खरे तर खिशात घड्याळे ठेवण्यासाठी बनवले गेले. जीन्समधील ही पॉकेट्स १८७९ मध्ये सुरू करण्यात आली होती. त्यापूर्वी जीन्स बनवल्या जात होत्या त्यामध्ये फक्त ३ खिसे असायचे, दोन समोर आणि एक मागे. १८०० च्या दशकात लोक त्यांची, चेन घड्याळे त्यांच्या कंबरेच्या खिशात ठेवत असत, परंतु, नंतर लेव्हीने जीन्समध्ये घड्याळे ठेवू शकणारी ही लहान पॉकेट्स तयार केली. या खिशांमुळे घड्याळे स्क्रॅच आणि पडण्याच्या भीतीशिवाय सहज ठेवता येतात. खुद्द लेवीच्या कंपनीच्या ब्लॉगवर याचा खुलासा करण्यात आला आहे.



## जीन्सच्या झिपरमध्येही एक खास गोष्ट



तुम्ही कधी लक्ष दिले असेल, तर तुम्हाला कळेल की तुम्ही परिधान केलेल्या, विकत घेतलेल्या किंवा पाहिलेल्या जवळजवळ प्रत्येक जीन्सच्या झिपवर इंग्रजी भाषा 'YKK' छापलेली आहे. याचा अर्थ Yoshida Kogyo Kabushikikaisha म्हणजे Yoshida Company Limited चा जपानी अर्थ आहे. ही कंपनी १९३४ मध्ये ताडाओ योशिदा या जपानी झिपर उत्पादकाने सुरू केली होती. आजही तीच कंपनी जगभरातील बहुतेक ब्रँडेड जीन्ससाठी झिपर्स बनवते.

## जीन्समधील लहान बटणांचे कार्य

तुमच्या लक्षात आले असेल, तर बहुतेक जीन्समध्ये वेगवेगळ्या बिंदूवर लहान बटणासारख्या गोष्टी असतात. जर तुम्हाला वाटत असेल की हे फक्त शोसाठी किंवा जीन्सचा लूक वाढवण्यासाठी आहेत, तर तुम्ही चुकीचे आहात. खरं तर, पूर्वीच्या काळी, जीन्स बनवायला सुरुवात झाली, तेव्हा शेतात काम करणारे, कष्टकरी जसे की मजुरांनी ती परिधान केली होती. त्याच्या कामामुळे, त्यांची जीन्स अतिशय सहज आणि पटकन फाटली, विशेषतः खिशात. या समस्येवर मात करण्यासाठी अमेरिकेतील जेकब डेव्हिस या शिंपीने जीन्समध्ये रिवेट्स नावाची ही छोटी बटणे लावण्याचे ठरवले. खिशाच्या सांध्यातील हे रिवेट्स केवळ त्यांची शिलाई मजबूत ठेवत नाहीत, तर खिसेदेखील व्यवस्थित ठेवतात. त्यावेळी जेकबकडे त्याच्या शोधाचे पेटंट घेण्यासाठी पैसे नव्हते, म्हणून त्याने सॅन फ्रान्सिस्कोमधील घाऊक विक्रेत्या लेव्ही स्ट्रॉसशी संपर्क साधला आणि त्याला पेटंट घेण्यास सांगितले. हा लेव्ही स्ट्रॉस प्रसिद्ध डेनिम कंपनी Levis' चा मालक होता.








# ड्राय शॅम्पू म्हणजे काय?

## केस स्वच्छ होऊन सुंदर होतात?

**बऱ्याच वेळा असे होते की तुम्हाला अचानक अशा ठिकाणी जावे लागते जिथे चांगले दिसणे आवश्यक आहे आणि तुमचे घाणेरडे केस धुण्यास आणि कोरडे करण्यासाठी तुम्हाला वेळ नाही. मग, तुम्ही काय कराल ? हे एखाद्या मुलाखतीच्या प्रसंगी, मित्रांची पार्टीवेळी केसांच्या या प्रमुख समस्येवर ड्राय शॅम्पू हा उपाय आहे. ड्राय शॅम्पूमुळे केसांच्या खराब दिवसाच्या कोणत्याही समस्येपासून सुटका मिळू शकते. एवढेच नाही तर, जर तुम्ही अशा लोकांपैकी एक असाल ज्यांना असे वाटते की आठवड्यातून दोनदा सामान्य शॅम्पू वापरणे तुमच्या स्कॅल्पसाठी चांगले नाही, तर तुमच्यासाठी ड्राय शॅम्पू हा एक चांगला पर्याय आहे. जे लोक काम करत आहेत. मग, ते पुरुष असो किंवा महिला आणि त्यांना सतत प्रवास करावा लागतो.**

केस स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी ड्राय शॅम्पू हा एक सोपा शॉर्टकट आहे. हा शॅम्पू तुम्ही छोट्या पिशवीत किंवा तुमच्या पर्समध्येही सहज ठेवू शकता. हे प्रवासासाठी अनुकूल आहे आणि तुम्ही ते तुमच्या ट्रॅव्हल किटमध्ये सहज ठेवू शकता आणि तुम्हाला हवे तेव्हा वापरू शकता. याच्या अनेक फायद्यांपैकी एक म्हणजे तुम्ही स्त्री असो वा पुरुष, प्रवासादरम्यान तुम्ही ते तुमच्या बॅगेत ठेवू शकता आणि कुठेही सहज वापरू शकता. मात्र, आजही ड्राय शॅम्पूचा पर्याय अनेकांसाठी नवीन आहे. त्याचा योग्य वापरही बहुतेकांना माहीत नाही. तथापि, या शॅम्पूची लोकप्रियता कालांतराने वाढत आहे. मात्र, ते वापरण्यापूर्वी त्याचे फायदे, तोटे आणि ते वापरण्याची योग्य पद्धत जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. ड्राय शॅम्पू लिक्विड शॅम्पूप्रमाणे काम करताना तुमचे केस स्वच्छ करतो, त्यात लपलेली चिकट घाण, तेल इत्यादी काढून टाकतो. तुम्हाला काही सेकंदात स्वच्छ, सुंदर आणि लहरी केस मिळू शकतात आणि चिकट खराब केस काढता येतात. या शॅम्पूच्या वैशिष्ट्यांबद्दल सांगायचे तर, ते वापरण्यास अतिशय सोपे आहे. केवळ योग्य तंत्राचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून तुम्हाला अपेक्षित परिणाम मिळू शकेल आणि त्याचे घातक परिणाम टाळता येतील. ड्राय शॅम्पू हा लिक्विड हेअर वॉशसाठी चांगला पर्याय आहे. परंतु, तुम्ही केवळ केसांसाठी त्यावर अवलंबून राहू नये आणि जेव्हा तुम्ही पाण्याने केस धुण्यास सक्षम नसाल तेव्हाच त्याचा वापर तुमच्यासाठी योग्य आहे.

## ड्राय शॅम्पूचे फायदे

कोरडा शॅम्पू केसांना छान पोत आणि व्हॉल्यूम देऊन स्वच्छ करते. तुमच्या केसांना छान सुगंधही येतो. ते वापरण्यासाठी तुम्हाला पाण्याचीही गरज नाही किंवा शॅम्पू वापरण्यासाठी तुमचे केस ओले करण्याची गरज नाही. कोरड्या शॅम्पूमध्ये कंडिशनर देखील मिसळले जाते आणि त्यामुळे ते वापरल्यानंतर तुम्हाला वेगळे कंडिशनर लावण्याची गरज नाही. या शॅम्पूचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात रसायनांचा वापर फारच कमी आहे आणि त्यात वापरलेले शोषक घटक तुमच्या केसांमधील घाण, धूळ आणि चिकटपणा बाहेर काढतात.

## योग्य ड्राय शॅम्पू कसा निवडावा ?

नावाप्रमाणेच हा शॅम्पू पावडर आणि स्प्रेच्या स्वरूपात कॅनमध्ये उपलब्ध आहे. ड्राय शॅम्पू तीन प्रकारांत उपलब्ध आहे, पंप डिस्पेंसर, एरोसोल स्प्रे आणि वास्तविक पावडर. तुम्ही कोणताही फॉर्म निवडाल, ते तुमच्या केसांच्या प्रकाराला अनुकूल असल्याची खात्री करा. तसेच, तुमच्या केसांच्या रंगाशी तंतोतंत जुळणारा शॅम्पू निवडा. अनेकदा असे दिसून येते की केस स्वच्छ करण्यासोबतच कोरड्या शॅम्पूमुळे केसांमध्ये पांढरे कण निघून जातात. ज्यामुळे कोंडासारखा लुक येतो. तुमचे केस सोनेरी असल्यास, टिंटेड ड्राय शॅम्पू खरेदी करा आणि गडद सावली निवडा. तुमचे केस डार्क तपकिरी असल्यास, तुम्ही फिकट टिंटेड ड्राय शॅम्पू घेऊ शकता. ड्राय शॅम्पूमध्ये तुम्हाला नैसर्गिक, केमिकल फ्री आणि ऑरगॅनिक पर्याय देखील मिळतात.

## ड्राय शॅम्पूची विविधता

ड्राय शॅम्पू देखील आजकाल फ्रूटी फ्रेग्रन्स, एम्पॉवरिंग, ऑरेंज लिंबूवर्गीय, क्ले बेस, अरेबिका कॉफी, काकडी ग्रीन टी, व्हाईट ग्रेपफ्रूट आणि मूसा मिंट, स्ट्रॉबेरी आणि स्वीट मिंट, एसेंशियल ऑइल ब्लेंड, मोरोक्कन ओइल यांसारख्या अनेक रंगांमध्ये आणि फ्लेवर्समध्ये उपलब्ध आहेत. यासोबतच रंगीत केसांच्या सुरक्षेसाठी युव्ही रेस प्रोटेक्टेड, सल्फेट पॅराबेन फ्री व्हेरियंटही बाजारात उपलब्ध आहेत आणि तुम्हाला अरोमा ऑइल आधारित आणि सेंद्रिय शॅम्पूदेखील सहज मिळतील.

## घरच्या घरी ड्राय शॅम्पू बनवा

आपण इच्छित असल्यास, आपण नैसर्गिक पद्धतीने घरी कोरडे शॅम्पू देखील बनवू शकता, ते तयार करण्यासाठी नैसर्गिक घटकांचा वापर केला जाऊ शकतो. ते तयार करण्यासाठी, घटकांचे योग्य प्रमाण आणि भाग याची काळजी घेणे फार महत्वाचे आहे. कंडिशनर, ओटमील पावडर, बेबी पावडर, बेकिंग सोडा, कॉर्न स्टार्च, तांदळाचा स्टार्च आणि गुलाबाच्या पाकळ्या एकत्र करून तुम्ही हा शॅम्पू बनवू शकता. सुरुवातीला बाजारातूनच चांगल्या ब्रँडचा शॅम्पू खरेदी करावा. तुम्ही ड्राय शॅम्पू ऑनलाइनही अगदी सहज ऑर्डर करू शकता आणि तुम्हाला हवे असल्यास तुम्ही कोणत्याही कॉस्मेटिक शॉपमधून ते खरेदी करू शकता, ते सामान्य शॅम्पूप्रमाणे सहज उपलब्ध आहे.

## ड्राय शॅम्पू कसा वापरावा ?

ड्राय शॅम्पू वापरण्याची योग्य पद्धत जाणून घेणे खूप महत्वाचे आहे. जेणेकरून तुमचे केस व्यवस्थित स्वच्छ होतील. त्याची वापरण्याची पद्धत लिक्विड शॅम्पूपेक्षा वेगळी आणि सोपी आहे. यासाठी ब्रशच्या साहाय्याने शॅम्पू संपूर्ण केसांमध्ये चांगला पसरवावा लागेल. हे वापरण्यासाठी तुम्ही शॅम्पू करण्यापूर्वी केसांना विभागांमध्ये विभागू शकता. केसांच्या मुळापासून केसांच्या टोकापर्यंत समान रीतीने स्प्रे करा. लक्षात ठेवा की तुम्ही कोरड्या शॅम्पूचा स्प्रे तुमच्या केसांपासून ७ इंचांपेक्षा थोडा जास्त दूर ठेवून सुरू करता, शक्यतो मऊ ब्रिस्टल्ड ब्रश वापरा जेणेकरून केस पूर्णपणे स्वच्छ करता येतील. जर तुमचे केस जाड आणि लांब असतील तर तुम्ही हा शॅम्पू जास्त काळ ठेवू शकता, साधारणपणे हा शॅम्पू ५ ते ७ मिनिटे ठेवता येतो. परंतु, जास्तीत जास्त वेळ १० मिनिटांसाठी ठेवता येतो. यानंतर बोटांच्या टोकांनी मऊ मसाज करताना केसांना हळूहळू खाली ब्रश करा.



## ड्राय शॅम्पू वापरताना लक्षात ठेवण्याच्या गोष्टी...

लक्षात ठेवा की केस व्यवस्थित स्वच्छ करा जेणेकरून शॅम्पूचे कण केसांमध्ये राहणार नाहीत आणि घाण पूर्णपणे निघून जाईल. केसांमध्ये शॅम्पूचे कण राहू नयेत यासाठी विशेष काळजी घेऊन केस व्यवस्थित धुवा. एकाच ठिकाणी वारंवार फवारणी करू नये. यामुळे शॅम्पू एकाच ठिकाणी जमा होऊ शकतो. खाज सुटणे, चिडचिड होणे आणि कोंडा होऊ शकतो. ड्राय शॅम्पूशी संबंधित समस्यांकडेही दुर्लक्ष करण्यासारखे नाही. कारण या शॅम्पूमुळे केसांमध्ये पांढरे कण नक्कीच राहतात. ज्यामुळे टाळूला इजा होण्याची शक्यता असते. परंतु, ते तुमच्या योग्य वापराच्या पद्धती आणि निवडीवर अवलंबून असते. योग्य ब्रँड आहे. ते वापरण्यापूर्वी, तुम्हाला तुमच्या केसांचा पोत आणि प्रकार माहित असणे आवश्यक आहे आणि जर तुम्हाला त्वचेची जळजळ, खाज सुटणे इत्यादी समस्या असतील तर ते वापरू नका. ड्राय शॅम्पू वापरण्यापूर्वी ते नीट तपासा आणि केसांमध्ये ओलेपणा तर नाही ना याची खात्री करा. कारण केस ओले असताना ड्राय शॅम्पू वापरल्यास केसांना लहान गाठी येऊ शकतात. नंतर त्यांना काढणे खूप कठीण होते. असे केल्याने केस तुटतात किंवा कडक होऊ शकतात, त्यामुळे कोरड्या केसांवरच ड्राय शॅम्पू लावा. तुम्ही झोपायच्या आधी या शॅम्पूने तुमचे केस धुवू शकता. जेणेकरून तुमच्या केसांमध्ये काही कण उरले असतील तर तुम्ही सकाळी ते काढून टाकू शकता आणि तुमचे केस ओले न होता ताजे लुक मिळवू शकता. याशिवाय, हे देखील महत्त्वाचे आहे की ज्याप्रमाणे तुम्ही लिक्विड शॅम्पूच्या बाबतीत सुप्रसिद्ध आणि चांगल्या ब्रँडच्या शॅम्पूमध्ये गुंतवणूक करता. त्याचप्रमाणे ड्राय शॅम्पूसाठी देखील तुम्ही काळजी घेतली पाहिजे आणि चांगले उत्पादन खरेदी केले पाहिजे. आजकाल प्रत्येक प्रमुख केस आणि सौंदर्य प्रसाधने कंपनीचे ड्राय शॅम्पू बाजारात येत आहेत. त्यांची किंमतही नाममात्र आहे. पण, त्यामध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी एखाद्या प्रोफेशनल ब्युटी एक्स्पर्टकडून योग्य ब्रँड्सची माहिती घेतली तर बरे होईल. आपण इच्छित असल्यास, आपण YouTube वर काही प्रामाणिक पुनरावलोकने इत्यादी देखील तपासू शकता.

# होममेड हेअरस्प्रे, केस होतील ताजेतवाने...



**त्वचेची काळजी घेण्याइतकेच आपल्या केसांची काळजी घेणे देखील महत्त्वाचे आहे. उन्हाळा असो किंवा हिवाळा, जर तुम्ही तुमच्या केसांकडे दुर्लक्ष केले आणि त्यांना योग्य उपचार दिले नाहीत तर ते खराब होऊ शकतात आणि त्यांची नैसर्गिक चमक गमावू शकतात. केसांची काळजी घेणारी अनेक उत्पादने बाजारात उपलब्ध आहेत जी केसांच्या सर्व समस्या सोडवण्याचा दावा करतात. परंतु, जर तुम्ही त्यांच्यापैकी एक असाल ज्यांना रासायनिक उत्पादनांवर जास्त खर्च करायचा नसेल तर तुमच्यासाठी आमच्याकडे काही नैसर्गिक पद्धती आहेत. आम्ही नैसर्गिक हेअरस्प्रेबद्दल बोलत आहोत जे तुमचे केस केवळ ताजेतवाने करत नाही तर ते निरोगी ठेवण्यास देखील मदत करते आणि तुम्ही ते घरी सहज बनवू शकता. केसांची काळजी घेणारी उत्पादने जी सुंदर केसांचे आरोग्य रहस्य आहेत.**

- आल्याचा हेअर स्प्रे : आल्याचा हेअर स्प्रे बनवण्यासाठी तुम्हाला दोन चमचे ताजे आले रस आणि एक कप पाणी घ्यावे लागेल. हे दोन्ही चांगले मिसळा आणि एका फवारणीच्या डब्यात ठेवा. ते चांगले हलवा आणि हेअर स्प्रे म्हणून वापरा. केस धुण्याच्या काही तास आधी तुम्ही ते तुमच्या टाळूवर लावू शकता. आठवड्यातून एकदा तरी हे हेअर स्प्रे वापरा. हे हेअर प्रोडक्ट्स घरच्या घरी केसांच्या स्टाइलसाठी सर्वोत्तम आहेत.
- मेथीच्या दाण्याचा हेअर स्प्रे : मेथीच्या दाण्यांमध्ये व्हिटॅमिन ए आणि सी भरपूर प्रमाणात असते. जे आपल्या केसांना टवटवीत ठेवण्यास मदत करतात. हेअर स्प्रे तयार करण्यासाठी बिया पाण्यात भिजवून रात्रभर सोडा. दुसऱ्या दिवशी त्याचे पाणी गाळून फवारणीच्या डब्यात भरावे. ते टाळूवर लावा आणि सुमारे २० मिनिटे तसेच ठेवा. दर आठवड्याला ही प्रक्रिया पुन्हा करा.
- कोरफडचा हेअर स्प्रे : कोरफड एक नैसर्गिक कंडिशनर म्हणून काम करते. हे डोक्यातील कोंडा कमी करते आणि तुमचे केस कुरळेपणापासून मुक्त ठेवते. हेअर स्प्रे तयार करण्यासाठी, तुम्हाला एक कप कोमट पाणी, एक चमचा कोरफडीचा जेल किंवा रस आणि आवश्यक लव्हेंडर तेलाचे पाच थेंब लागेल. हे सर्व एकत्र करून स्प्रे बाटलीत भरा. वापरण्यापूर्वी ते चांगले हलवा. ओल्या केसांवर किंवा कोरड्या केसांवर फवारणी करा.
- ॲपल सायडर व्हिनेगर हेअर स्प्रे : हे सफरचंद सायडर व्हिनेगर हेअरस्प्रे तुमच्या केसांना कोंडापासून दूर ठेवण्याचा उत्तम मार्ग आहे. ते तयार करण्यासाठी, ४ चमचे व्हिनेगर, १०० मिली पाणी, १५ थेंब लव्हेंडर आवश्यक तेल, ५ चमचे गुलाबजल घ्या आणि चांगले मिसळा. त्यांना स्प्रे बाटलीत साठवा. केस धुण्यापूर्वी टाळूवर स्प्रे करा. तुम्ही झोपण्यापूर्वीही लावू शकता.



## गुलाबपाणी हेअर स्प्रे

गुलाबपाणी टाळूला तेलमुक्त ठेवते आणि डोक्यातील कोंड्यासह कोणत्याही प्रकारच्या संसर्गापासून आणि जळजळीपासून मुक्त होते. यासाठी गुलाबाच्या काही पाकळ्या पाण्यात उकळा. पाण्याचा रंग बदलू लागला आणि त्यात गुलाबाच्या पाकळ्याचे सार आले की ते आचेवरून उतरवून पूर्णपणे थंड होऊ द्या. आता, ते स्प्रे बाटलीत ओता आणि ते तुमच्या केसांवर स्प्रे करण्यासाठी तयार आहे.

# नगरच्या मेडिकल कॉलेजसाठी समितीची नियुक्ती

■ खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश ■ जागा पाहण्याचे समितीला निर्देश

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**राज्यात क्षेत्रफळाने सर्वाधिक मोठ्या असलेल्या लोकसभेच्या नगर दक्षिण मतदार संघात शासकीय वैद्यकिय महाविद्यालय सुरू करावे या खासदार नीलेश लंके यांच्या मागणीस यश आले आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्य शासनाने नगर जिल्ह्यात हे महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात त्रिसदस्यीय समितीची नेमणूक केली असून या महाविद्यालयासाठी जागेचा शोध घेण्यासंदर्भात समितीस सुचना देण्यात आल्या आहेत. खासदार नीलेश लंके यांनी ही माहीती दिली.**

खा. नीलेश लंके यांनी संसदेत क्षेत्रफळाने राज्यात सर्वाधिक मोठया असलेल्या नगर जिल्हयात शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नसल्यासंदर्भात लक्ष वेधले होते. लंके यांच्या या मागणीची दखल घेत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार महाविद्यालयासाठी जागा निश्चित करण्यासाठी समितीचे गठन करण्यात आले आहे. या समितीमध्ये पुण्यातील बी.जे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रा.डॉ. मुरलीधर तांबे, डॉ. योगेश गवळी यांच्यासह जालना येथील शासकीय महाविद्यालयाचे प्रा. डॉ. इब्राहिम अन्सारी यांचा समावेश आहे.

यासंदर्भात राज्य शासनाने पारीत केलेल्या आदेशामध्ये नमुद करण्यात आले आहे की, नगर लोकसभा मतदार संघाचे खासदार नीलेश लंके यांनी नगर जिल्ह्यात शासकीय महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात संसदेत मागणी केलेली आहे केंद्र सरकारच्या निर्देशानुसार अहिल्यानगर येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालया तसेच त्या संलग्नीत ४३० रूग्णांचे खाटांचे रूग्णालय स्थापन करण्यासाठी सुचविण्यात आलेल्या तसेच अहिल्यानगर जिल्हयातील इतर सुयोग्य जागांची राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषानुसार तपासणी करून सुयोग्य जागेची तपासणी व निवड यासाठी ही समिती गठीत करण्यात येत असल्याचे या आदेशात नमुद करण्यात आले आहे.



### पहिल्याच अधिवेशनात वेधले होते लक्ष

अहिल्यानगर जिल्हा राज्यात विस्ताराने सर्वाधिक मोठा असतानाही या जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसल्याने सर्वसामान्य रूग्ण तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कुचंबना होत असल्याचे सांगत खा. नीलेश लंके यांनी संसदेच्या पहिल्याच अधिवेशनात सरकारचे लक्ष वेधले होते. तसे पत्रही त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय स्वास्थ व परिवार कल्याण मंत्री जगत प्रकाश नडडा,ख् वित्त मंत्री निर्मला सितारमण यांच्यासह केंद्रीय शिक्षण मंत्री धमेंद्र प्रधान सिंह यांना सादर केले होते.

### आरोग्यात जिल्हा मागासलेला

आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षणाच्या दृष्टीने नगर जिल्हयाची स्थिती मागासलेली आहे. गोरगरीब जनतेसाठी स्वस्त आणि सुलभ आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणे गरजेचे असल्याचे सांगत खा. लंके यांनी या मागणीचा आग्रही पाठपुरावा केला होता.

# पळव्यातील चिमुरडयांना सुसज्ज अंगणवाडी!

कॅरिअर मायडिया कंपनीचा पुढाकार

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**सुपा-पारनेर विस्तारीत औद्योगिक वसाहतीमधील कॅरिअर मायडिया या बहुराष्ट्रीय कंपनीच्या सामुदायिक सामाजिक जबाबदारी निधीतून पळवे खुर्द येथील चिमुरडयांसाठी सुसज्ज अंगणवाडी बांधून दिली आहे.**

कॅरिअर मायडिया या कंपनीने पळवे खुर्द येथील अंगणवाडीसाठी साडेआठ रूपये खर्चून सुसज्ज इमारत उभी करून दिली. मुख्य अध्ययन हॉल, स्वयंपाकगृह तसेच गोदाम याचा त्यात समावेश आहे.

कॅरिअर मायडिया कंपनीकडून परिसरातील गावांमध्ये स्नेहालय या संस्थेच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिरे घेऊन वंचित घटनांना दिलासा दिला आहे. शाळांना स्वच्छतागृह, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाके, वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देऊन ती रूजविण्यासाठी ग्रंथालयांना मदत करत सोशल मीडियात गुरफटलेल्या तरूण पिढीला वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी कंपनी व्यवस्थापन पुढाकार घेत आहे.

यावेळी कंपनीचे मनुष्यबळ अधिकारी कपील धुमाळ, प्रॉडक्शन मॅनेजर अनिल सोळंकी, लॉजिस्टिक हेड कृष्णा टकले, क्लॉलिटी हेड राजीव सींग, प्लॅनिंग हेड महेश चंदर यांच्यासह सरपंच प्रसाद तरटे, मा. उपसरपंच तात्यासाहेब देशमुख, रोहित जाधव, अमोल शेळके, संदीप भांडलकर, अंगणवाडी सेविका आपटे, जाधव यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी यावेळी उपथित होते.



■ कॅरिअर मायडिया या बहुराष्ट्रीय कंपनीच्या वतीने पळवे खुर्द येथे अंणवाडीसाठी सुसज्ज इमारत उभी करून दिली.

### चिमुडीनेच कापली फीत !

गुरूवारी मोठया उत्साहात या अंगणवाडीचा लोकार्पण सोहळा कंपनीच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. विशेष म्हणजे कंपनीने ज्यांच्यासाठी ही सुविधा निर्माण करून दिली आहे. त्यांच्यापैकीच एका चिमुरडीच्या हाती कात्री देत अंगणवाडीचे लोकार्पण करण्याची बहुमान देण्यात आला.

### रोजगाराबरोबरच सामाजिक बांधिलकीही

कंपनीच्या वतीने तालुक्यातील शेकडो बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचाही प्रयत्न केला आहे. परिसरातील गावांतील शाळा, अंगणवाडी, ग्रंथालये यांना मदतीचा हात देत कंपनीने एक सक्षम पिढी उभी करण्यासाठी योगदान दिले आहे.

# निघोज येथे ग्रामीण रूग्णालय हवे

शिवबा संघटनेची मागणी

**निघोज : प्रतिनिधी**

**तालुक्यातील सर्वात मोठी निघोज ग्रामपंचायत, लोकसंख्या तसेच परिसरातील गावांचा विचार करता निघोज येथे ग्रामीण रूग्णालय सुरू करावे अशी मागणी शिवबा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.यासंदर्भात संघटनेचे पदाधिकारी संबंधित मंत्र्यांची भेट घेणार आहेत.**



निघोज परिसरात वडनेर बुद्रुक, गाडीलगांव, गुणोरे, कोहकडी, म्हसे, राळेगणथेरपाळ, जवळे, देवीभायरे ही गावे असून निघोज येथे सध्या असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात अतिशय तुटपुंज्या सुविधा आहेत. निघोजची लोकसंख्या २५ ते ३० हजारांवर असून देवीभोयरे येथील साखर कारखान्याचे शेकडो मजुर उपचारासाठी निघोज येथे येतात. मात्र सुविधांअभावी बऱ्याच रूग्णांवर उपचार होत नाहीत. निघोज येथे शवविच्छेदनाची सुविधा नाही. त्यामुळे त्यासाठी संबंधित शव पारनेर येथे न्यावे लागते. म्हणूनच गेल्या अनेक वर्षांपासून शिवबा संघटना निघोज येथे ग्रामीण रूग्णालय असावे ही मागणी सातत्याने करत आहे. निघोजच्या ग्रामीण रूग्णालयासंदर्भात आरोग्य विभागाच्या उपसंचालकांकडे अहवालही सादर करण्यात आला आहे. मात्र त्यास मुर्त स्वरूप येत नाही ही शोकांतीका असल्याचे शिवबा संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

लवकरच शिवबा संघटनेचे पदाधिकारी मुंबईत मंत्रालयात जाउन सर्व मंत्री तसेच अधिकारी यांची भेट देऊन निघोज येथील आरोग्य केंद्राच्या आवष्यकतेबाबत लक्ष वेधून रूग्णालयाचा प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### पदाधिकारी, अधिकाऱ्यांना निवेदन

ग्रामीण रूग्णालयासंदर्भातील निवेदन राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे, खासदार नीलेश लंके,आमदार काशिनाथ दाते, नाशिक येथील आरोग्य विभागाचे उपसंचालक, नगरचे शल्यचिकित्सक यांना पाठविण्यात आले आहे.

# निघोज येथे शेतकरी प्रबोधन मेळावा

**गाडीलगांव : प्रतिनिधी**

**गोदरेज ॲग्रोवेट लिमिटेड या कंपनीच्या विद्यमाने निघोज येथील नंदन लॉन्स येथे शेतकरी प्रबोधन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात तज्ञांनी फायदेशीर दूध उत्पादनाविषयी दुग्ध उत्पादकांना मार्गदर्शन करण्यात आले.**

या मेळाव्यात कंपनीचे तांत्रीक विभागाचे प्रमुख डॉ. नामदास ननवरे, विक्री व्यवस्थापक गोपीनाथ जेथे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दुग्ध उत्पादनाबाबत मार्गदर्शन करत दूध उत्पादकांच्या शंकांचे निरसन केले.

या मेळाव्यात जनावरांची अनुवंशिकता वाढविणे, चारा व्यवस्थापन, वासरू संगोपन, कालवड तयार करणे यासह दुग्ध व्यवसायाचे अर्थशास्त्र आदी विषयांवर चर्चा करण्यात येऊन मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनाचा शेतकरी बांधवांना निश्चित दुध उत्पादन वाढीसाठी फायदा होउन आर्थिक दृष्टया दुग्ध व्यवसाय सफल होण्यासाठी मोठी मदत होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



या मेळाव्यासाठी निघोज व परिसरातील शेतकरी, दुग्ध व्यवसायीक, दूध संकलन केंद्रांचे चेअरमन व इतर पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. या मेळाव्याचे सुत्रसंचलन दत्ता भुकन यांनी केले तर मंगेश लंके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पारनेर महाविद्यालयाचा वनस्पती संशोधन केंद्राशी सामंजस्य करार

वनस्पती संवर्धन व प्रचार क्षेत्रातील भागीदारी मजबूत होणार

**पारनेर : प्रतिनिधी**

**वनस्पती संवर्धन व प्रचार क्षेत्रातील भागीदारी मजबुत करण्याच्या हेतूने पारनेर महाविद्यालयाचा वनस्पतीशास्त्र विभाग तसेच शिरवळ येथील नवरोजी गोदरेज वनस्पती संशोधन केंद्र यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला.**

पारनेर महाविद्यालय व वनस्पती संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. हा करार वनस्पती प्रजातींच्या संवर्धनासाठी एक महत्वपूर्ण मैलाचा दगड ठरणार आहे. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात प्रतिष्ठित संशोधक, शास्त्रज्ञ डॉ. क्रांती याद यांनी या कार्यशाळेचा उददेश, दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन तसेच गावरान अन्नधान्य वनस्पती वाणांचे संवर्धन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमुद केले.

कार्यशाळेच्या व्दितीय सत्रात डॉ. सागर दातीर यांनी सीड बँकिंगबद्दल जागरूकता वाढविणे, बियाणे संकलन, साठवण आणि उगवण यातील नवनवीन तंत्रे आणि सर्वोत्तम पध्दतींबाबत मार्गदर्शन केले. तर रोहित कुंभार यांनी तृणधान्य, भरडधान्य व कडधान्य याबद्दल माहीती दिली. तृणधान्य आपल्या आहारामध्ये कसे महत्वाचे आहे हे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. एस एल खपके, प्रा. टी. एस.चिकणे, प्रा.आर.ए.शेख, प्रा. एम.ए. वाबळे, प्रा.डी.डी. पवार तसेच लॅब सुपरवायझर सुभाष बर्डे, सुरेश बोरूडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यशाळेमध्ये वनस्पतीशास्त्र विभागाचे ६७ विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यशाळेचे सुत्रसंचलन व आभार प्रांजली बोरूडे यांनी केले.

### ज्ञान, संसाधने, कौशल्याची देवाण घेवाण

कार्यशाळेदरम्यान नवरोजी गोदरेज वनस्पती संशोधन केंद्र व पारनेर महाविद्यालयाचा वनस्पतीशास्त्र विभाग यांनी सहकार्यात्मक संशोधन आणि संवर्धनाच्या प्रयत्नांसाठी त्यांच्या वचनबध्दतेला औपचारिकता देत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. दोन संस्थांमधील ज्ञान, संसाधने आणि कौशल्याची देवाण घेवाण सुलभ करणे हा कराराचा उद्देश आहे.

### फलदायी सहयोगाची सुरूवात

हा सामंजस्य करार आमच्या संस्थेमधील एक फलदायी सहयोगाची सुरूवात आहे. आम्ही एक्स-सीटू संवर्धन आणि बियाणे बँकिंगच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी एकत्र काम करण्यास उत्सुक आहोत.

डॉ. रविंद्र देशमुख
वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख



■ पारनेर महाविद्यालयात पार पडलेल्या कार्यशाळेत वनस्पतीशास्त्र विभाग व शिरवळ येथील वनस्पती संशोधन केंद्र यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

### शेती आणि भावी पिढीसाठी लाभदायक करार

दोन्ही संशोधन केंद्रातील ही भागीदारी वनस्पती विविधतेच्या संवर्धनासाठी, पर्यावरण, शेती आणि भावी पिढयांना लाभदायक ठरेल. पारनेर महाविद्यालयातील विद्यार्थी हे होतकरू व कष्टाळू असून पारनेर तालुक्यातील दुर्मिळ वनस्पती तसेच गावरान वाण जमा करण्यास मदत करतील.

प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर
कार्यशाळेचे अध्यक्ष

# निकृष्ट कामाचे बिल अदा केले जाणार नाही

■ सरपंच संध्या ठुबे यांचे स्पष्टीकरण ■ उपसरपंचांचा प्रसिध्दीसाठी खटाटोप



**कान्हूरपठार : प्रतिनिधी**

**१५ व्या वित्त आयोगातून बाजारतळ रस्त्याचे काम निकृष्ट झालेले असल्याने ठेकेदारास त्याचे बिल अदा करण्यात आलेले नाही. या कामासह ग्रामपंचायत मार्फत सुरू असलेली सर्वच कामे दर्जेदार झाली तरच त्यांची बिले अदा करण्यात येणार आहेत. तशा सुचना ठेकेदारास अगोदरच देण्यात आल्याचे स्पष्ट करतानाच उपसरपंचांचा केवळ प्रसिध्दीसाठी खटाटोप सुरू असल्याचा टोला सरपंच ठुबे यांनी लगावला.**

सरपंच ठुबे यांनी सांगितले की आम्ही पदभार घेतल्यानंतर शासनाच्या विविध योजनेअंतर्गत तसेच १५ व्या वित्त आयोगातून मंजुर कामांची कामे सुरू आहेत. ही कामे मंजुर पत्रकानुसार दर्जेदार करून घेण्याचे नियोजन सर्व सदस्यांना विश्वासात घेउन करण्यात येत आहे.

बाजारतळ रस्ता कामाच्या बाबतीत सिमेंट कॉंक्रीटचा दर्जा निकृष्ट असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ठेकेदाराकडे त्याबाबत विचारणा करण्यात आली. सिमेंट निकृष्ट आल्याने कामाचा दर्जा खराब झाल्याचे ठेकेदारानेही मान्य केले आहे. दर्जा सुधारल्याशिवाय बिल आदा न करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला असल्याचे ठुबे यांनी सांगितले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत ठुबे, सविता धनंजय ठुबे, सुनीता गायखे, गंगूबाई तांबे, धनंजय व्यवहारे यांच्यासह धनंजय ठुबे, किरण ठुबे, गणेश तांबे, अंकुश सोनावळे, अप्पा सोनावळे, बाबा गायखे, राहुल व्यवहारे, संजय सोनावळे, सुरज नवले, अप्पासाहेब सोनावळे, प्रशांत खामकर, ज्ञानेश्वर गायखे आदी उपस्थित होते.

### गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार करणार

उपसरपंच प्रसाद नवले हे सातत्याने प्रसिध्दीसाठी ग्रामपंचायत कर्मचारी व प्रशासनास वेठीस धरत आहेत. निकृष्ट कामाचे बिल अदा करण्यात आलेले नाही. नवले हे माझ्या शिक्क्यावर बनावट लेटरपॅड तयार करून त्यावर सरपंच म्हणून खोटया स्वाक्षऱ्या करत आहेत. काही दिवसांपूर्वी चेकबुक देखील गहाळ करण्यात आले होते. त्यासंदर्भात गटविकास अधिकाऱ्यांकडे पुराव्यानिशी तक्रार करण्यात येणार आहे.

संध्या ठुबे, सरपंच

### त्या कुटूंबांना नळजोड मिळणार

प्रभाग क्र. २ मधील मंजुर झालेल्या जलवाहिनीच्या दरपत्रकानुसार काही कुटूंबांना नळ जोड देण्यात अडचण येत होती. परंतू या कामाचे वाढीव अंदाजपत्रक तयार करून त्या कुटूंबांना नळ जोड देण्याचा निर्णय घेण्यात आला असून ते कामही लवकरच पुर्ण होईल.

सविता धनंजय ठुबे, सदस्या

# निकृष्ट रस्ता पुन्हा करा

■ पाहणीनंतर उपअभियंत्यांचे आदेश ■ प्रसाद नवले यांची माहिती

**कान्हूरपठार : प्रतिनिधी**

**कान्हूर ग्रामपंचायतीच्या वतीने १५ व्या वित्त आयोगातून करण्यात येत असलेले बाजारतळ ते विरोली या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट असल्याने उपअभियंता के.व्ही.जाधव यांनी हा रस्ता पुन्हा करण्याचे आदेश संबंधित ठेकेदारास दिल्याचे उपसरपंच प्रसाद नवले यांनी सांगितले.**

कान्हूरपठार येथील बाजार तळावरील सिमेंटचा रस्ता पाच लाख रूपये खर्चून तयार करण्यात आला होता. मात्र महिनाभरातच तो खराब झाला. या रस्त्याच्या साईड पटटयाही भरण्यात आल्या नाही. त्यासंदर्भात उपसरपंच प्रसाद नवले यांनी सार्वजनीक बांधकाम विभाग तसेच ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रार केली होती. तक्रारीनुसार उपअभियंत्यांनी रस्त्याच पाहणी केली असता रस्त्याच्या कॉंक्रीटचा दर्जा, डेनेज चेंबर, ड्रेनेज लाईनचे पाईप आदींमध्ये तृटी आढळून आल्या. हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आल्याने उपअभियंत्यांनी हा रस्ता ठेकेदाराने पुन्हा करून द्यावा असा आदेश देण्यात आला.

हे काम निकृष्ट झाल्याचे अधिकारी व ठेकेदार यांनी मान्य केले. संबंधित ठेकेदार व ग्रामसेवक यांना नोटीस बजावण्यात येऊन पंधरा दिवसात हे काम पुन्हा करण्याचे आदेश देण्यात आल्याचे नवले यांनी सांगितले.

यावेळी उपसरपंच प्रसाद नवले यांच्यासह सदस्य ज्ञानेश्वर ठुबे, धनंजय ठुबे, विशाल लोंढे, सतीश ठुबे, वैभव साळवे, नामदेव ठुबे, संजय ठुबे, बंडू व्यवहारे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



### प्रभाग २ चा पाणीपुरवठा सुरळीत होणार

प्रभाग २ मध्ये जलवाहिनी न टाकल्याने त्या भागातील अनेक कुटूंबांना पिण्याचे पाणी मिळत नव्हते. त्यासंदर्भात ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे तक्रार करण्यात आल्यानंतर उपअभियंता पी.पी.पंडीत यांनी पाहणी करून जल वाहिनी टाकून या कुटूंबांचा पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले.

प्रसाद नवले, उपसरपंच

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com